सोमवार, दि. १० मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सभागृहाबाहेर आंदोलन ही काळेंची चमकोगीरी म्हणजे नौटंकी!

### २०२४ च्या शासनादेशानुसार टप्पावाढ देण्यात यावी- मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम काळे हे सत्ताधारी पक्षाचे आमदार आहेत. त्यांच्याच पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आहेत. सभागृहात प्रश्न मांडून तरतूद करण्यास भाग पाडण्या ऐवजी आमदार सभागृहाबाहेर आंदोलन करताहेत ही आमदार काळेंची चमकोगिरी म्हणजे नौटंकीच आहे. १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासनादेशा नुसार पुढील टप्पावाढ देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करून शिक्षकांची वेठबिगारी संपवावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम केली आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की आझाद मैदानावर शिक्षकांनी टप्पावाढ मिळण्यासाठी आंदोलन केले तेंव्हा तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी आझाद मैदानावर येऊन टप्पावाढ घोषित केली. त्याबाबत १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनादेश निर्गमित केला. परंतु अद्याप पर्यंत त्याची अंमलबजावणी केली नाही. अर्थ संकल्पीय अधिवेशनात याबाबत तरतूद होईल अशी अपेक्षा होती परंतु ती फोल ठरली आहे. मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी या बाबत विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. वास्तविक पहाता राज्यात त्यांच्या पक्षाची सत्ता आहे. त्यांच्या पक्षाचे नेते अजित दादा पवार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आहेत. त्यामुळे सभागृहात प्रश्न मांडून टप्पावाढीसाठी आवश्यक तरतूद करण्या ऐवजी आमदार महोदय सभागृहाबाहेर आंदोलन करताहेत ही विक्रम काळेची चमकोगिरी म्हणजे नौटंकीच आहे. २००४ साली शिक्षक मतदार संघात मते मागताना सत्ताधारी पक्षाचा आमदार असेल तर शिक्षकांचे प्रश्न सहज सुटतील अशी भूमिका दिवंगत वसंतराव काळे यांनी मांडली होती. मराठवाड्यातील शिक्षकांनी त्यावेळेस त्यांना निवडून दिले. त्यांच्या अकाली दु:खद निधनानंतर गेली वीस वर्षे विक्रम काळे विधान परिषदेत शिक्षकांचे नेतृत्व करत आहेत. पैकी किमान बारा वर्षे त्यांच्या पक्षाची सत्ता आहे.२००९ साली कायम शब्द पान २ वर




### भारतीय संघाची ऐतिहासिक कामगिरी

## चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद पटकावले

**दुबई** - भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली. न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा पान २ वर




## भंगारच्या गोडाऊनला भीषण आग

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील जालना-संभाजीनगर महामार्गावर बारवाले कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या पद्मावती नगर येथे भंगारच्या गोडाऊनला आज दिनांक ०९ रविवार रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीमध्ये अंदाजे चार ते पाच लाखाचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

या आगीमध्ये छोटा हत्ती वाहनाचे नुकसान झाले असून एक टाटा सफारी वाहनाचे सुद्धा नुकसान झाले आहे. शेख नसीर आणि अब्दूल सलाम या दोन जणांचे हे दोन गोडाऊन आहेत. या गोडाऊनमध्ये पुठ्ठा तसेच रिकाम्या बाटल्या,अल्युमिनियम,प्लायवुड ई. मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे आग झपाट्याने वाढत गेली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी तात्काळ दाखल झाला परंतु आग आटोक्यात येत नसल्यामुळे अग्निशमन दलाचे दुसरे बंब सुद्धा मागवण्यात आले. दोन्ही बंबाच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पान २ वर

## शाळेच्या मैदानावर खेळात रमल्या महिला

### जागतिक महिला दिनानिमित्त तपोवन गोंधन येथे विशेष कार्यक्रम

**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यातील तपोवन गोंधन येथील शाळेत शनिवारी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. महिको प्रोडक्शन देऊळगाव राजा व जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तपोवन गोंधन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महिला सबलीकरण या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच अंजना फलके या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच पंचफुला फलके, माजी सरपंच अरुणा चौधरी, आशा वर्कर्स शशिकला फलके यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या शिक्षिका सुलभा गायकवाड यांनी पान २ वर



युवा आदर्श

### सावित्री वाघिणी ...

धन्य हे सावित्रीबाई
ज्योतीबां अर्धांगिनी
शोभे खरी पतिव्रता
लखलखत्या संगिनी
व्रत घेतले जनसेवेचे
कार्य मग्नती योगिनी
विधवा परित्यक्ताची
तूचि जाहली भगिनी
अंध श्रद्धा विरोधात
होशी तू रणरागिणी
संसार सुखा ना रमे
निस्वार्थ गं जोगिणी
लढता अन्याय लढा
होई सेना औक्षहिणी
स्नेह प्रेम वर्षाव करी
होऊन नक्षत्र रोहिणी
वाटशी ज्ञानाचे दान
कोवळे बीजा पेरणी
सांभाळे सारा समाज
शोभली सार्थ गृहीणी
लढलीस तू काळाशी
सार्थ होऊन वाघिणी
कळते आता महती
भिन्न करसे तव पाणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## स्व. सेवावृत्ती दमोतराव पाटील मोरे प्रेरणा पुरस्काराने सीताबाई मोहिते व सुचिता सिनगारे सन्मानीत



**जालना । प्रतिनिधी** - जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शुक्रवार (८ मार्च) रोजी ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने पाटील कृषी फार्म नळविहिरा येथे कृषी क्षेत्रात नावीन्यपूर्ण कार्य करणाऱ्या सिंधी काळेगाव येथील सौ. जिजाबाई रामभाऊ मोहिते व खेडगाव येथील सौ. सुचिता दत्तात्रय सिनगारे यांना शेकडो विधवा माता व बचत गटातील महिलांच्या उपस्थितीत गौरवपत्र, साडी-चोळी, सीताफळ रोपटे, पुष्पगुच्छ व नाममात्र रोख रक्कम देऊन स्व. सेवावृत्ती श्री. दमोतराव पाटील मोरे प्रेरणा पुरस्कारने सन्मानीत करण्यात आले. पुरस्कार वितरण करतांना माजी सरपंच श्रीमती लीलाबाई मोरे पाटील, ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील, सौ. संगीता मोरे पाटील, हरीश मोरे पाटील, सौ. शोभा मोरे पाटील, सरपंच सौ. प्रीती जंजाळ, ग्रामपंचायत अधिकारी श्री. दत्तात्रय खरात, सुवर्णलंकार मंडळाचे अध्यक्ष श्री. गजानन उदावंत, ग्रामपंचायत सदस्य सौ. उषा आकाश वाकूडे, कृषी सहाय्यक श्रीमती ज्योती शिंदे, श्री. रामभाऊ मोहिते, दत्तात्रय सिनगारे, जि. प. शिक्षिका व शेकडो महिला, भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी ग्रामपंचायत प्रायोजित, सुवर्णलंकार विविध विकास मंडळाच्या सहकार्याने ग्रोव्हिजन गटशेती पान २ वर

## आमदार संतोष दानवे यांचे टेंभुर्णी माहेश्वरी समाजाकडून अभिनंदन



**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - सलग तिसऱ्या वेळी आमदार झालेले जाफ्राबाद भोकरदन विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार श्री संतोष दानवे यांची पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल टेंभुर्णी माहेश्वरी समाजवतीने त्यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करून त्यांचे सत्कार केले. टेंभुर्णी सह भागात या भागात विकास कामा निमित्य आमदार यांचे विशेष लक्ष्य असून त्यांची या पदामुळे जवाबदारी आणि व्यस्तता वाढली असून भेटलेल्या या जवाबदारी मुळे आपल्या भागात विकास कामे जलद होतील यात शंका नसून ते लवकर टेंभुर्णीचा दौरा करणार आहे. या वेळी माहेश्वरी समाजाच्या वतीने डॉ. प्रशांत काबरा, प्रदीप काबरा, अलकेश सोमाणी,श्रीकांत काबरा कल्पेश सोमाणी यांनी त्यांची भेट घेऊन त्यांचे सत्कार केले.

## जागतिक महिला दिनानिमित्त क्लबतर्फे महिला आरोग्य विषयक जनजागृती

**जालना । प्रतिनिधी** - जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विवेकानंद हॉस्पिटल आणि लायन्स क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी पीसीओडी, इनफर्टिलिटी आणि संधिवात यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर आयोजित आरोग्यविषयक व्याख्यानात तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांच्या आरोग्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

डॉ. चारुस्मिता हवालदार आणि डॉ. माधुरी पाकणीकर यांनी पीसीओडी हा आजार नसून चुकीच्या आहार व बैठ्या जीवनशैलीमुळे होणारी समस्या असल्याचे स्पष्ट केले. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य वैद्यकीय सल्ल्याच्या मदतीने हा विकार नियंत्रणात ठेवता येतो. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने व आयव्हीएफ उपचार पद्धतीमुळे गर्भधारणाही सहज शक्य होते.

डॉ. माधुरी पाकणीकर यांनी इनफर्टिलिटीबाबत माहिती देताना सांगितले की, टक्के प्रजनन समस्या महिलांमध्ये आढळतात. अनियमित ओव्हुलेशन, फॅलोपियन ट्यूबमधील अडथळे आणि गर्भाशयातील विकृती (फायब्रॉइड्स, एंडोमेट्रिओसिस) यामुळे गर्भधारणेत अडथळे निर्माण होऊ शकतात. यावर शस्त्रक्रिया, संप्रेरक उपचार आणि आयव्हीएफ हे प्रभावी पर्याय उपलब्ध आहेत. डॉ. गिरिजा सचदेव यांनी संधिवाताविषयी माहिती देताना स्पष्ट केले की, हा आजार हाडे व सांध्यांना प्रभावित करणारा असून वयानुसार काही सांधे नैसर्गिकरित्या झिजतात. मात्र, योग्य उपचार आणि जीवनशैलीतील बदलांमुळे हा त्रास नियंत्रित करता येतो.

अध्यक्षीय समारोपात विवेकानंद हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीमंत मिसाळ यांनी महिलांच्या सशक्तीकरणावर भर दिला. त्यांनी महिलांनी आपल्या न्याय व हक्कांसाठी सतर्क राहण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाला विवेकानंद हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीमंत मिसाळ, संचालक डॉ. राजकुमार सचदेव, डॉ. चारुदत्त हवालदार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश गोयल, डॉ. अनिल कायंदे, डॉ. पूजा कायंदे, डॉ. सचिन मिसाळ, डॉ. गिरिजा सचदेव, प्रशासकीय अधिकारी शशीराज केंढे, व्यवस्थापक किशोर आघाम तसेच लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, कोषाध्यक्षा कल्पना बियाणी, वंदना मुदंडा, अतुल लड्ढा, द्वारकादास मुदंडा यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक जयश्री लड्ढा यांनी केले. सूत्रसंचालन किशोर आघाम यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार कल्पना बियाणी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रविराज केंढे, सचिन कांबळे, वैभव गडकरी, दुर्गेश श्रीवास, रफिक शेख, अशोक नरवडे, जय हिवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## संपादकीय

# शिक्षणाधिकारी मंगला धूपे यांना निलंबित करा

## मराठवाडा शिक्षक संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** देश उभारणीत शिक्षण व शिक्षकाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी मुबलक, कुशल, सुसंस्कारित मनुष्यबळ तयार करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते शिक्षक तणाव मुक्त असावा म्हणून त्यांना अर्थीक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा देण्यात आली आहे.शिक्षकांच्या अडीच अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात आली असून जिल्हा पातळीवरील समस्या सोडविण्यात शिक्षण अधिकारी महोदयांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

शिका संघटित व्हा आणि संघर्ष कराचा मंत्र घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. त्याप्रमाणे समाजातील एक जागरूक आणि महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षक संघटित झाला व आपले कर्तव्य बजावत असताना हक्कासाठी संघर्ष करण्यासाठी संघटना स्थापन केल्या,मराठवाडा शिक्षक संघ ही त्यापैकीच एक!या संघटनेस ५८ वर्षाचा इतिहास असून शिक्षकांना सेवा शाश्वतीपासून सेवानिवृत्ती पर्यंतचे लाभ मिळवून देण्यात संघटनेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आज हि आपले शैक्षणिक कार्य पूर्ण करून अन्याय ग्रस्त शिक्षकांच्या मागे खंबीरपणे उभा राहण्याची भूमिका मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी घेतात.जालना जिल्ह्यात शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत,दोन महिन्यापासून आठ ते दहा शाळांचे वेतन प्रलंबित आहे, आर्थिक नियोजन कोलमडल्याने त्या शाळावर कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी परेशान आहेत,मासीक नियमीत वेतनात ही कमालीची अनियमितता आहे. नियमबाह्य वैयक्तिक मान्यतेवरील आक्षेप व इतर प्रलंबित प्रकरणाबाबत पदाधिकारी रीतसर निवेदन घेऊन गेले असताना शिक्षनाधिकारी(माध्यमिक) पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न/समस्या सोडवण्याऐवजी संघटना पदाधिकाऱ्यांना अपमानित करतात,अरेरावी, गैरवर्तन करतात,आता तर त्यांची मजल संघटना पदाधिकाऱ्यांवर पोलिसांकडे खोटी तक्रार करण्यापर्यंत गेली आहे. कार्यालयीन वेळेत शिक्षणाधिकारी माध्यमिक व त्यांचे कर्मचारी क्वचितच कार्यालयात असतात,मात्र सायंकाळी सहा नंतर कार्यालय सुरू होते.आर्थिक सौदेबाजी करणाऱ्यांची कामे कार्यालयीन वेळानंतर मार्गी लागतात. त्यानुसारच नियमानुसार कामे करण्याचा आग्रह धरणाऱ्या मराठवाडा शिक्षक संघ पदाधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना अडचण होत असून संघटना पदाधिकाऱ्यांना अपमानित करून उलट त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. शिक्षकांची आडवणूक करणाऱ्या शिक्षणाधिकारी माध्यमिक जालना यांच्या बद्दल शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष नाराजी निर्माण झालेली आहे.त्यांची दखल घेऊन शिक्षकाचे आर्थिक मानसिक



शोषण करून प्रश्न प्रलंबित ठेवणारे मग्रूर शिक्षणाधिकारी माध्यमिक जालना यांना हटवणे, योग्य ती कार्यवाही करणे व त्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याची आम्ही आग्रही मागणी करत आहोत. त्वरित कार्यवाही करून अप्रिय घटना टाळाव्यात ही विनंती. संघटनेच्या मागण्या खालील पद्धतीने आहेत.

श्रीमती मंगल धुपे गायकवाड शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद जालना यांना पदावरून हटवावे.

शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद जालना यांच्या संपत्ती संपत्तीची चौकशी करावी.

शिक्षकांशी मगरुरपणे वर्तन करून अपमानित करणारे शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद जालना यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

जालना जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील वेतनातील अनियमित्ता दूर करावी.

जगन वाघमोडे यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्यावा.

नियमबाह्य वैयक्तिक मान्यतांची चौकशी करण्यात यावी.

दिर्घ काळापासून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावी.

२०२०- २१ पासून प्रलंबित भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात.

फेब्रुवारी २०२५ देयकासोबत सातवा वेतन आयोगाचा पाचवा हप्ता (राहिलेले १,२,३ व ४था) त्या सह ऑनलाइन पद्धतीने करणे बाबतच्या ७ फेब्रुवारी २०२५ च्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. दिनांक २७/ ०२ /२०२५ रोजी चे माननीय शिक्षणाधिकारी कार्यालयाचे सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावे.

कार्यालयात संध्याकाळी सहा वाजे नंतर भरपूर गर्दी असणे व संचयिका निकाली काढल्या जातात.

पुर्ण वेळ वेतन अधीक्षक देण्यात यावा. निवेदनावर प्रा डॉ मारोती तेगमपुरे,ज्ञानोबा वरवटे, प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, रमेश आंधळे, संजय येळवंते, नारायण मुंडे, फरखुंद अली सय्यद,भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, तुकाराम पडघन,प्रदुम्ण काकड, भगवान धनगे, हकीम पटेल इत्यादीच्या सह्या होत्या.

## सावित्रीबाई फुलेंचे कार्य मानव जातीला भूषणावह

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा आज म्हणजे १० मार्च २०२५ रोजी १२८ वा स्मृतिदिन. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पान १ वरुन

### सभागृहा बाहेर ...

काढताना २०१२ पर्यंत मूल्यांकन करून प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान देण्याचा शब्द शासनाने दिला होता त्यानुसार कायम शब्द काढलेल्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा वर्ग आणि तुकड्यांना २०१८ साली शंभर अनुदान मिळणे आवश्यक होते. परंतु २०२५ उजाडले तरी टप्पावाढीसाठी शिक्षकांना झगडावे लागत आहे. याकाळात अनुदान मागणाऱ्या शिक्षकांवर अमानुष लाठीमार करण्यात आला. वर त्यांच्यावरच हाफ मर्डर चे गुन्हे दाखल करण्यात आले. अनेक शिक्षक एक रुपयाही वेतन न घेता सेवानिवृत्त झाले. काहींनी इहलोकीची यात्रा संपविली. महाराष्ट्र सरकारने शिक्षकांची घोर निराशा केली आहे. सत्तारूढ पक्षाच्या शिक्षक आमदारांनी सभागृहाबाहेर आंदोलनाचे नाटक करण्या पेक्षा आपल्या सरकारला व नेत्यांना टप्पावाढीसाठी आर्थिक तरतूद करण्यास सरकारला भाग पाडून शिक्षकांची वेठबिगारी संपवावी असे राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

### चॅम्पियन ट्रॉफीचे ...

कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात ३४ धावांची नाबाद खेळी खेळून टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर ठेवत राहुल नाबाद परतला. यावेळी त्याला हार्दिक पंड्याचीही साथ लाभली ज्याने १८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. किवी संघाकडून मायकेल ब्रेसवेल आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले.

न्यूझीलंड संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पुन्हा एकदा भारताच्या फिरकी चौकडीने आपली कामगिरी चोख बजावली. भारताच्या फिरकी विभागाने चांगली कामगिरी करत धावांवर अंकुश ठेवला आणि न्यूझीलंडला २५१ धावांवर रोखलं. रचिन रवींद्र आणि विल यंगने किवी संघाला अर्धशतकी भागीदारी रचत चांगली सुरूवात केली. पण रोहित शर्माची रणनिती आणि भारताच्या फिरकी विभागाने टीम इंडियाला सामन्यात परत आणले. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने ३७ धावा, डॅरिल मिचेलने ६३ धावा आणि ब्रेसवेलने ५३ धावांची खेळी केली.

भारताकडून कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्तीने २ विकेट्स तर रवींद्र जडेजा-मोहम्मद शमीने १-१ विकेट घेतली. रोहित शर्माने कमालीचे नेतृत्त्व करत संघाला विजय मिळवून दिला.

### भंगारच्या गोडाऊनला ...

अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

दरम्यान गोडाऊनला आग लागल्याची माहिती मिळताच चंदनझीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी केली.

यावेळी अग्निशमन दालाचे अधिकारी माधव पानपट्टे, सहाय्यक आधिकारी संदिप दराडे,वाहन चालक रवी तायडे,पंजाबराव देशमुख, शिफ्ट ईंचार्ज शरद भांदर्गे,फायरमन किशोर सकट,सादिक अली यांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. आग लागल्याच्या घटनेची माहिती परिसरात पसरताच स्थानिक नागरीकांनी घटनास्थळी मोठी गरूदी केली होती. योगेश लहाने यांच्या सह स्थानिक नागरिक राजू कोरे,कार्तीक देशमुख ई. नी आग आटोक्यात आणण्यासाठी सहकार्य केले.

दरम्यान सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने आग लागल्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी तसेच गोडाऊन धारकांनी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांनी केले आहे.

### शाळेच्या मैदानावर ...

आपल्या प्रास्ताविकात महिला दिनाचे महत्त्व विशद केले. तर गृहणी प्रतिभा फलके यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या भाषणात सांगितले की एक चांगला समाज निर्माण करायचा असेल तर त्यात महिलांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. महिलांनी केवळ चूल आणि मूल इथपर्यंतच मर्यादित न राहता प्रत्येक क्षेत्रात पुढे आले पाहिजे असेही त्या म्हणाल्या. दुसऱ्या सत्रात महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात गावातील वयोवृद्धसह सर्वच महिलांनी हिरीरीने सहभाग घेतला. या स्पर्धेत विजयी ठरलेल्या महिला प्रतिभा अनिल फलके ( पैठणी साडी), स्वाती संजय लोणकर ( प्रेशर कुकर), अनिता संतोष फलके (थर्मास) यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सुलभा गायकवाड यांनी केले तर महिकोचे फील्ड ऑफिसर विशाल सोळंके यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिको प्रोडक्शन देऊळगाव राजा चे मुख्य अधिकारी प्रवीण सूर्यवंशी, विशाल सोळंके, मंगेश वनवे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष परसराम फलके, उपाध्यक्ष अनिल फलके, मुख्याध्यापक पृथ्वीराज तळेकर, शिक्षक, अंगणवाडीताई, विद्यार्थी, महिको कर्मचारी तथा ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.

चौकट-जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे उद्बोधन व्हावे या उद्देशाने त्यांच्या सबलीकरणाच्या या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. यात ग्रामीण महिलांनी उस्फुर्त सहभाग घेऊन मोठ्या आनंदाने सर्व स्पर्धेत सहभाग घेतला. अशा कार्यक्रमातून निश्चितच महिलांच्या सक्षमीकरणाला वाव मिळणार आहे.

### स्व. सेवावृत्ती ...

संघाने विधवा माता व बचत गटातील महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात सोळा बचत गटातील महिला व इतर विधवा माता अशा दीडशे महिलांनी सहभाग नोंदवला. सहभागी सर्व महिलांना प्रशस्तीपत्र देऊन सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनिल मोरे, ग्रामपंचायत कर्मचारी राजेंद्र क्षीरसागर, आशाताई सौ. सुनिता म्हस्के, सौ. मंदा मोरे, शिवाजी गाडेकर, युवराज मोरे, कु. प्राची गायकवाड, कु. सानिका गाडेकर, कु. प्रीती गाडेकर, कु. नेहा मोरे, कु. सृष्टी सरोदे, कु. तनुजा गायकवाड यांच्यासह अनेकांनी प्रयत्न केले.

## वाचकांचे मनोगत

# एसटी सेवा ग्रामीण प्रवाशांचे जीवन वाहिनी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची वाहतूक सेवेला ७७ वर्षे झाली.एवढ्या वर्षात अनेक राजकीय पक्षांची सरकारे आली आणि गेली.आमदार, खासदार यांनी एस टी.बस मध्ये कायम आपली दोन आसने आरक्षण करून घेतली.स्वातंत्र्यांनंतरच्या लोकप्रतिनिधींना खरतर आरक्षणाची गरज नाही.एस.टी.महामंडळ अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य. विविध आगारांचे व्यवस्थापक यांनी एवढ्या वर्षात प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा दिल्या असत्या तर आज प्रवाशांच्या नशिबी दुरावस्था आली नसती.ग्रामीण भागातील ७० टक्के प्रवासी एस.टी.सेवेवर अवलंबून आहेत. मोडकळीस आलेल्या बस प्रवाशांच्या दिमतीला आहेत. कोकणातील कोणताही एस.टी.डेपो निवडा ,परिवहन मंत्र्यांनी आपल्या अधिकाऱ्यांसह भेट द्यावी. नादुरुस्त गाड्या रस्त्यावर धावताना दिसतील. टायर पंक्चर, मोडलेली आसने,अपुरी यंत्रसामुग्री अशा अनेक कारणांनी दररोज वेगवेगळ्या मार्गावरील धावणार्या बस रद्द करण्याची वेळ आगार व्यवस्थापकावर येते.ज्या गावात दिवसातून एकच गाडी धावते तेथील ग्रामस्थांचे हाल पाहवत नाहीत. एस.टी.ची स्थानके म्हणजे रोगराई पसरवणारी आगारे आहेत. येथील मूतार्या,शौचालये,उपहारगृहे कायम अस्वच्छ,दुर्गंधीने माखलेली असतात. सरकारकडून ७५ वर्षावरील प्रवाशांना मोफत प्रवास, महिलांना ५० टक्के सवलतीत प्रवास, ६५ वर्षावरील प्रवाशांना सवलत हे सर्व उपक्रमाबद्दल तिजोरीतून पैसा खर्च होतो. सरकारने सर्व सवलती बंद करून एस.टी.बस सशक्त करावी. स्वारगेट स्थानकातील महिलेवरील अत्याचारानंतर महिलांची सुरक्षा हा मुद्दाच चर्चेचा विषय ठरला.सरकार आपली एस टी बस सुंदर आणि सुरक्षित कधी करणार असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.शतक महोत्सव जवळ येत असताना तरी सुधारणा व्हावी.एस.टी.वाहन चालकांचा सरकारने विशेष गौरव करावा कारण गाडी नादुरुस्त आहे हे माहित असून सुद्धा स्टेरींग धरतात ते केवळ प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून एवढेच. वस्तीला जाणार्या वाहन वाहक,चालक यांच्या मनातल्या अडचणी सरकारने समजून घ्याव्यात. एस.टी.ग्रामीण प्रवाशांची जीवन वाहिनी आहे थांबता कामा नये.

**महादेव गोळवसकर, कुर्ला- मुंबई, ९८६९४७६२०९**

# सिरसगाव येथे नारिशक्तिचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील सिरसगाव येथे दि.०८/०३/२०२५, रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ग्रा. पं . सिरसगाव तथा भाजपा महिला आघाडी उपतालुका अध्यक्ष छाया घोरबांड यांच्या संयुक्त विद्यमाने नारीशक्तीचा सन्मान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महिला सरपंच, श्रीमती गोदावरी कंकाळ. सौ. कावेरी पांडुरंग खरात. ग्रामपंचायत सदस्य, श्रीमती मंदा केदारनाथ खरात. उपसरपंच, प्रभाकर जाधव. ग्रामपंचायत सदस्य, स्वप्निल रोडगे.भाजपा कार्यकर्ते, पांडुरंग खरात. चेअरमन, हरिभाऊ खरात. पोलीस पाटील, शेषराव सोळंके. पत्रकार मारोती घोरबांड. भाजपा कार्यकर्ते, सुनील खरात.भाजपा युवा कार्यकर्ते, अनिल जाधव.भाजपा युवा मोर्चा उपतालुकाध्यक्ष, संतोष खरात.इत्यादींची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यक्रमांत डॉ. पल्लवी नितीनराव खरात.मुंबई पोलीस मध्ये निवड झालेली, पल्लवी शिवाजी सोळंके.नवोदित कीर्तनकार ह.भ प. अयोध्या ताई येवले. मुंबई पोलीस मधील सौ . मीरा दत्ता शेळके या युवतींचा सत्कार करण्यात आला होता. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व नारीशक्ती महिला उपस्थित होत्या.



# जाऊ देवाचिया गावा मध्ये भक्ती, आध्यात्मिक रहस्यांचा शोध - डॉ. प्रमोद कुमावत

## पुस्तक प्रकाशन, सत्कार सोहळा थाटात संपन्न!



**मंठा । प्रतिनिधी -** भक्ती कशी असावी, कशी नसावी असे आध्यात्मिक रहस्य, प्रश्नांचा शोध नारायण कांगणे यांनी वेदान्त, आध्यात्मिकता, श्रवण ,चिंतन, मनन, निदिध्यासन, या पायऱ्यांतून जे मिळवल ते जाऊ देवाचिया गावा मध्ये घेतला असून सदर ग्रंथ वाचनातून विवेकाची प्राप्ती होईल. असे मत आध्यात्मिक प्रबोधनकार ह. भ. प. डॉ. प्रमोद कुमावत यांनी केले.

अनुभव प्रतिष्ठान च्या वतीने नारायण कांगणे लिखित जाऊ देवाचिया गावा या पुस्तकाचे रविवारी ( ता. ०९) तळणी येथे डॉ. प्रमोद कुमावत यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

मसाप च्या केंद्रीय संचालिका, भाव कवयित्री डॉ.संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यास गुरुवर्य बापूराव महाराज परतूरकर, माजी सैनिक हरिभाऊ सोनवणे, डिगंबर सरकटे, भाष्यकार प्रा. प्रदीप देशमुख, अनुभव प्रतिष्ठानचे पंडितराव तडेगावकर,जगत घुगे, सरपंच सुनील कांगणे, संयोजक डॉ. अविनाश कांगणे, कल्पना कांगणे, इंजि. सुनील कांगणे, जयश्री कांगणे, यश कांगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नारायण कांगणे यांनी कर्मातून ईश्वर पूजा हे आध्यात्मिक ज्ञान, सर्वात्मक देवाची कल्पना मांडण्याचा प्रयत्न केला असे सांगितले.

प्रा.प्रदीप देशमुख यांनी पुस्तकावर भाष्य केले. प्रास्ताविकात पंडितराव तडेगावकर यांनी पुस्तकाच्या निर्मिती प्रक्रियेचा प्रवास नमूद केला. शिवाजी कायंदे यांनी लेखक परिचय दिला. सूत्रसंचालन जगत घुगे यांनी केले तर यांनी डॉ. अविनाश कांगणे यांनी आभार मानले. याप्रसंगी गुरुवर्य बापूराव महाराज परतूरकर, माजी सैनिक हरिभाऊ सोनवणे, डिगंबर सरकटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या वेळी पंचक्रोशीतील साहित्य प्रेमी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### माळरानावर भावनेचे नंदनवन फुलवावे - डॉ. तडेगावकर

जसे आहोत तसे आपल्या जगण्यावर प्रेम करता आलं पाहिजे. नारायण कांगणे यांनी शिक्षकी पेशाचा अविर्भाव न दाखवता आपले जगणे आध्यात्मिक चौकटीत बसवले. कवी, लेखकांनी खडकाळ माळरानावर नंदनवन फुलवण्यासाठी भावनिक ओलावा निर्माण करावा, अशी अपेक्षा भाव कवियत्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केली. सुमधुर कविता सादर करून त्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समिती

# अध्यक्षपदी प्रदीप रत्नपारखे तर सचिवपदी राज रत्नपारखे



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप अशोकराव रत्नपारखे तर सचिवपदी युवक कार्यकर्ते राज पद्माकर रत्नपारखे यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यंदाच्या१३५ व्या जयंतीनिमित्त सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या निवडीसाठी रविवारी (दि.९) अंबड चौफुलीवरील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक नेते गणेशराव रत्नपारखे हे होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व पक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप अशोकराव रत्नपारखे यांची तर सचिवपदी युवक कार्यकर्ते राज पद्माकर रत्नपारखे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीपूर्वी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. ब्रम्हानंद चव्हाण, ड. बी. एम. साळवे,गणेशराव रत्नपारखे आदींनी मार्गदर्शन करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून जयंती शांततेत व उत्साहात तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरी करावी, असे आवाहन केले.

ज्येष्ठ सामाजिक नेते मंडळींच्या हस्ते नूतन अध्यक्ष व सचिव यांचा सत्कार करण्यात आला.

या बैठकीस ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकरराव रत्नपारखे, ड. शिवाजीराव आदमाने, सुदामराव सदाशिवे,सुभाषराव गाडगे, काशीनाथ साळवे, मावळते अध्यक्ष सचिन कांबळे, सचिव ड. सिध्दार्थ चव्हाण, कार्याध्यक्ष कपील खरात, कोषाध्यक्ष प्रवीण रत्नपारखे,बबनराव रत्नपारखे, पप्पू चत्रे,जीवन खंडागळे,सुनील साळवे, ड. महेंद्र साळवे, महेंद्र रत्नपारखे, भास्कर अण्णा रत्नपारखे, संतोष खरात,संजय हेरकर,संदीप खरात, योगेश रत्नपारखे,अंबादास चित्तेकर, विलास रत्नपारखे, संदीप साबळे, मिलिंद बोर्डे, पावलस निर्मळ, काशीनाथ मगरे,गौतम वाघमारे, कारभारी रत्नपारखे,राहुल रत्नपारखे, विशाल साळवे, राहुल आदमाने, अनिल रत्नपारखे, दत्ता आसलकर, रावसाहेब रत्नपारखे, दीपक रत्नपारखे, भगवान पालवे, लक्ष्मण जाधव, सचिन मुळे, रवींद्र चंदनशिव, शेख जमीर, विजय मगरे, मनोज म्हसके,जय खरात, सुरज बोर्डे, गणेश गायकवाड, प्रमोद म्हसके, राजेंद्र जाधव ,दीपक खरात, आकाश खरात, पवन वाहुळ, कपिल खरात, आदींची उपस्थिती होती.

# सफा बैतूलमाल जालना तर्फे रेशन किट चे वाटप



**जालना । प्रतिनिधी -** सफा बैतूलमाल जालना तर्फे रेशन किट चे वाटप करण्यात सुरुवात करण्यात आली आहे. या किट मध्ये आटा ५ किलो, तांदूळ ३ किलो, तेल ५ किलो, खजूर १ किलो, मसूर दाल, १ किलो, चना दाल, १ किलो, नमक, शकर, हलदी, मिर्ची, चाय पत्ती चा समावेश आहे

पवित्र रमजान महिन्या सुरू असून सफा बैतूलमाल जालना तर्फे ४०० कुटुंबांना रेशन किट चे वाटपला आज पासून सुरुवात करण्यात आली

यावेळी मुफ्ती अब्दुल रहेमान काजी ए शरिअत मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड जिल्हा जालना व अध्यक्ष सफा बैतूलमाल आणि मौलाना रईस अहमद मिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले

कार्याध्यक्ष मुफ्ती फहीम, मुफ्ती फारुक, मुफ्ती युसुफ, मुफ्ती सोहेल, हाफिज एजाजुद्दीन, हाफिज जुबेर, मौलाना मुख्तार, मौलाना अकबर, मौलाना अर्शद, हाफिज वसिम, मौलाना सलीम, आदी आणि सफा बैतुलमल जालनाच्या वतीने, यावर्षीही ५०० च्या वर गरजू लोकांना रेशन किट वाटप करण्यात येणार आहे आहे. आणि दानातून रमजान रेशनचे वाटप आणि वर्षभरातील असहाय्य विधवा आणि बेरोजगारांसाठी मासिक वेतन, आजारी आणि संकटग्रस्तांना वैद्यकीय मदत, कृपया अनाथ आणि गरीब मुलांच्या शैक्षणिक सुविधांसाठी इदाराला मदत केली जाते

# शासकीय सामान्य रुग्णालयाजवळ मेडिकल वेस्टेज रस्त्याच्या कडेला; नागरिकांच्या आरोग्याला धोका

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयाच्या रस्त्याच्या कडेला मेडिकल वेस्ट कचरा टाकला जात असल्याचा प्रकार समोर आलाय.त्यामुळे या भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न उपस्थित झाला आहे. जिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जिल्ह्याभरातील नागरिक उपचारासाठी घाटी रुग्णालयामध्ये ये - जा करत असतात. याच बरोबर जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी पण याच रस्त्यावरून कार्यालयाकडे जात असतात. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचीही ये-जा सुरू असते. अशातच आता मेडिकलचा घाणकचरा या रस्त्यावर आणून टाकल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दोन दिवसांमध्ये हा कचरा न उचलल्यास आपण स्वखर्चाने कचरा उचलून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये टाकून देऊ असा इशारा सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी आज दि.०९ रविवार रोजी दुपारी तीन वा. दरम्यान दिला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरातच जर कचरा टाकून रोगाला आमंत्रण दिले जात असेल तर करावे कसे हा साहजिक प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

# जारा पठाण हिचा पहिला रोजा पूर्ण



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी - येथील बाजयीपुरा परिसरातील रहिवासी अजिम पठाण यांची मुलगी जारा पठाण (वय ८) या चिमुकलीने पवित्र रमजान महिन्यातील आपला पहिला रोजा पूर्ण केला आहे. याबद्दल तिचे वडील अजिम पठाण, आजोबा न्यामत खा पठाण, मामा मोसिन पठाण, मोबीन पठााण, अहमद पठाण, व नातेवाईकांनी तिचे कौतूक केले.

# प्राथमिक शाळा काळेगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिन प्राथमिक शाळा काळेगाव केंद्र कुंभारझरी तालुका जाफराबाद या ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला.






जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गावातील सर्व पालक महिला व इतर गावातील महिलांना आमंत्रित करून, माता पालक गटाच्या माध्यमातून माता पालक गटाची भूमिका, व शैक्षणिक बाबतीत मातांचं महत्त्व, विद्यार्थी जडणघडणीबरोबर संस्कारीत पिढी घडवण्याचं काम माता पालक गटांचा आहे ,माता भगिनींचा आहे असे प्रतिपादन शिक्षिका श्रीमती मनिषा वायाळ मॅडम यांनी केले. आपल्या पाल्यास नियमित शाळेत पाठवून शैक्षणिक नुकसान विद्यार्थ्यांचे होऊ नये याकरीता मातांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. असे प्रतिपादन श्रीमती घोडके मॅडम यांनी केले.

भविष्यात विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पाहायचा असेल तर माता-पालकांनी आपली भूमिका विद्यार्थी जीवनात अतिशय महत्त्वाची आहे असे प्रतिपादन कुमारी आघाव मॅडम यांनी केले.

आपल्या गावातील शाळा अतिशय सुंदर पद्धतीने काम करते आहे त्यामुळेच येणाऱ्या शैक्षणिक सत्रात माता-पालकांनी आपले विद्यार्थी निश्चित आमच्या शाळेत प्रवेशित करावे .असे आवाहन व विनंती श्रीमती वैष्णवी पिंपळे मॅडम यांनी माता पालक गटास केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीम. अन्नपूर्णा ताई वसंतराव चव्हाण, प्रमुख अतिथी म्हणून माजी जि. प. सदस्या श्रीम. सविताताई गणेशराव मस्के, शालेय व्यवस्थापन समिती सदस्या श्रीमती अरुणा गणेश चव्हाण, श्रीम.लताबाई सिद्धार्थ शेजुळ, महिला पालक श्रीम. बिस्मिल्ला बी शेख, सौ शशिकला दधरे, श्रीम. रेशमा शेख, सौ अंजना चव्हाण, सौ निर्मला ताई जाधव, प्रयाग बाई शिंदे, अंजना चव्हाण, रुक्मिना गायकवाड ,उषा शेजवळ वंदना शेजुळ ,अंजुम शेख, कल्पना जाधव.. शाळेचे मुख्याध्यापक श्री भगवान शेळके, शिक्षक श्री गजानन आघाव, श्रीम. सुभद्रा घोडके मॅडम, श्रीम. मनीषा वायाळ मॅडम, कु. वैष्णवी पिंपळे मॅडम, श्री प्रताप खेडेकर, अंगणवाडी ताई श्रीम. राधा मॅडम,रत्ना मॅडम, अंगणवाडी मदतनीस सौ. नंदा पिंपळे , सौ. सुरेखा पिंपळे, सौ. सरला पिंपळे मॅडम, कु. पूनम आघाव, सौ. स्नेहा खेडेकर सौ.जगताप मॅडम, पोषण आहार प्रमुख श्रीम. अंजनाताई इंगळे आदी उपस्थित होते.

# डॉ. किरण गावंड यांना 'डॉक्टरेट ऑफ फिलोसोफी' पदवी प्रदान

**ठाणे । प्रतिनिधी -** येथे राहणाऱ्या डॉ. किरण राम गावंड (कंपनी कमांडर) यांना नुकतच अमेरिकेतील प्रोवेस विद्यापीठातर्फे डॉक्टरेट ऑफ फिलोसोफी ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

गेली ३५ वर्ष पगार न घेता केलेली देशाची सेवा, भारतीय संस्कृती व इतिहासाचे जतन आणि संवर्धन तसेच १५० वर्षापासूनच्या पौराणिक वस्तु, नाणी व शस्त्रे याचे एका ठिकाणी प्रदर्शनीस तथा सुरक्षीत ठेवण्यासाठी काशीबाई माधवराव गावंड संग्रहालयाची स्व-कतृत्वावर स्थापना, देशाच्या ठेवा आम जनतेला प्रदर्शनास खुला करून त्यांनी देशाची शान वाढवली आहे . डॉ . गावंड यांच्या जीवनाचे तत्वज्ञान येणा-या पुढील पिढयांना आदर्श मार्ग दाखविण्यास मार्गदर्शन ठरेल यात शंका नाही. या कार्याला सलाम करण्यासाठी त्यांना प्रोवेस विद्यापीठातर्फे ही पदवी एका शानदार कार्यक्रमात सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली. हि पदवी प्राप्त केल्याबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये महिला दिन उत्साहात

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वाटूर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या वेळी शाळेतील विद्यार्थिनीं यांच्या हस्ते शाळेतील शिक्षिकांना पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तेजस्विनी खामकर. आराध्या नीचळ. कृष्णाली रुद्राके. रिया प्रधान. इश्वरी उबाळे. विद्या नांगरे. या विद्यार्थिनींनी महिले वर होणारे अत्याचार व नारीशक्ती यावर आधारित नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली होती.

हा कार्यक्रम यशस्वी करणारे करण्यासाठी शाळेतील शिक्षिका, सय्यद नसरीन. पाटील भाग्यश्री. काळे साधना. उबाळे वंदना. सनैकर त्रिवेणी. शेळके गजानन. इत्यादींनी मेहनत घेतली.



## तुळजाभवानी डीएमएलटी ॲण्ड प्यारामेडिकल इन्स्टिट्यूट येथे महिला दिन साजरा



मंठा । प्रतिनिधी - महिला दिनानिमित्त तुळजाभवानी डीएमएलटी अँड पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट वांजोळा पु.मंठा येथे. जागतिक महिला दिनानिमित्त सर्वप्रथम राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुप्रियाताई अभय बोराडे (बोराडे हॉस्पिटल व बाल रुग्णालय मंठा) प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. रूपाली श्याम सरकटे (महिला वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय मंठा ) शकुंतलाताई सतीशराव निर्वळ अध्यक्षा ज्ञानराज शिक्षण प्रसारक मंडळ मंठा व माऊली अर्बन पतसंस्था मंठा. या उपस्थित होत्या. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्या म्हणून शकुंतलाताई निर्वळ यांनी महिलांना आपल्या महिला दिनानिमित्त आपल्या मुला मुलींना कसे संस्कार द्यावेत त्याविषयी माहिती दिली. व विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवून महापुरुषांची पुस्तके वाचायला लावावीत असे मार्गदर्शन त्यांनी केले. व दुसऱ्या प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. रूपालीताई सरकटे यांनी आरोग्य विषयक महिलांना माहिती दिली तसेच अध्यक्षीय भाषणात डॉ. सुप्रियाताई बोराडे यांनी महिलांना महिला दिनानिमित्त भारतीय संविधानाविषयी जनजागृती करून महिला दिना व संविधानाने महिलांना दिलेला अधिकारा यांची त्यांना जाणीव करून देण्यात आली. व आरोग्य विषयक माहिती दिली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योतीताई चव्हाळ व साधना माळचिमणे यांनी केले व आपले मनोगत शिवकन्याताई चव्हाण, चट्टे मॅडम , सोनाली संतोष चव्हाळ यांनी महिला दिनानिमित्त महिलांना मार्गदर्शन केले .व नंतर म्युझिकल व संगीत खुर्ची असे कार्यक्रम घेऊन बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन तुळजाभवानी डी.एम.एल.टी. अँड पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट वांजोळा पु. मंठा संस्थेच्या अध्यक्षा साधनाताई माळचिमणे व तुळजाभवानी महिला मंडळ ग्रुप वांजोळा मंठा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखाताई माळचिमने व आभार प्रदर्शन मनीषा अमर चव्हाळ यांनी केले.

## देशाच्या प्रगतीत व नवीन पिढी घडवण्यात व आदर्श ठेवण्यात सिंहाचा महिलांचा वाटा - डॉ. देवेश पाथ्रीकर

**बदनापूर । प्रतिनिधी -** आज नागरी क्षेत्रात स्त्रिया अधिकारिणी बनून पुढे आल्या. शिक्षिका ते कलेक्टरपर्यंत, नगरसेविका ते पंतप्रधानापर्यंत इ. विविध क्षेत्रांत स्त्रियांनी मानाच्या जागा आपल्या कुशलतेच्या स्वबळावर पटकावल्या अन् सर्वच पदावर महिला सक्षमतेने कार्यरत आहेत. शासकीय, राजकीय, शैक्षणिक आदी क्षेत्रांत ३० टक्के जागा राखीव असल्यामुळे मिळालेल्या संधीचं सोनं करत कुटुंबाच्या अर्थार्जनासाठी त्या मदत तर करतच आहेत, पण देशाच्या प्रगतीत व नवीन पिढी घडवण्यात, त्यांच्यापुढे आदर्श ठेवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आयएएस, आयपीएस होऊन नागरी सेवा करणार्या कितीतरी स्त्रिया आपले कौशल्य देशासाठी अर्पण करीत आहेत असे प्रतिपादन निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी केले.

बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पस मध्ये आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिनानिमित्त बदनापूर तालुक्यातील महिला अधिकारी,महिला लोकप्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा, डॉक्टर आदींचा सत्कार आयोजित करण्यात आला होता, कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी डॉ. देवेश पाथ्रीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव डॉ. एम. डी. पाथ्रीकर,संस्थेचे संचालक प्रज्ञा पाथ्रीकर, डॉ. एस. एस. शेख, डॉ. खान नाजमा उपस्थित होते. बदनापूर नगराध्यक्ष वैशाली जर्हाड, उपनगर अध्यक्ष नसीम बी शेख मतीन, नगरसेवक चित्रा संतोष पवार, विद्याचल संस्थेच्या उपाध्यक्ष शोभा मदन, प्राचार्य पूजा मदन सह पाचशे अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा, व इतर महिला अधिकारी पद्धधिकारी आदींचा शाल, गिफ्ट व प्रमाणपत्र



देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बोलतांना संस्थेचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर म्हणाले की,पूर्वी घरकाम करणे, स्वयंपाकाची कामे करणे, भाजीपाला विकणे इ. कामे करणे कमी प्रतीचं मानलं जायचं, पण सध्या मध्यमवर्गीय कुटुंबातील शिक्षित, अशिक्षित, गरजू स्त्रिया स्वयंपाकाची कामे, मुले सांभाळणे, पाळणाघर चालवणे, मेस चालवणे, भाजी-पोळी केंद्र, हॉटेल व्यवसाय, शिवणकाम करणे, गरजू पेशंटची नर्स म्हणून शुश्रुशा करताना दिसतात. आजमितीला स्त्रिया त्यांचे सुप्त गुण हेरून विकसित करण्यासाठी विविध क्षेत्रांतील मार्गदर्शन घेऊन तर कधी डिजिटल माध्यमांच्या यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्रामचा आधार घेतात व त्यांच्या बकेट लिस्टमध्ये असणार्या सुप्त इच्छांची स्वप्नपूर्ती करताना दिसतात. ज्या स्त्रिया शिक्षित आहे, परंतु काही कौटुंबिक अडचणींमुळे स्वतःच करियर करू शकल्या नाहीत, अशा स्त्रिया या संधीचं सोनं करत बुटिक टाकणं, ब्युटी पार्लर टाकणं, ऑनलाईन कपड्यांचा व्यवसाय करणे, गायनाचे क्लास घेणे, चित्रकला, डान्स, स्विमिंग, झुब्बा, योगाचे क्लास, जिम ट्रेनर, नोकरी, ऑर्गेनिक फळभाज्या विकणे, ठिकठिकाणी व्याख्यान म्हणून जाणे व जनजागृती करणे आदी कामे करताना स्त्रिया दिसून येत असून स्त्रीया कोणत्याही क्षेत्रात अग्रेसर असल्याचे प्रतिपादन केले. निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने आयोजित आंतर राष्ट्रीय महिला जागतिक दिनानिमित्त बदनापूर तालुक्यातील सर्व क्षेत्रात कार्यरत महिलांना सकाळचे जेवण देखील देण्यात आले. मोठया उत्साहात सदरचा कार्यक्रम पार पडला.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.